**समरी फौजदारी खटला क.३५१/२०२२ मधील नि.कं.१० खालील आदेश**

(सरकार वि. मंदार गोपाळ दामले)

(C.N.R.NO.MHPU170011222022)

प्रस्तुतचा अर्ज आरोपी अर्जदार नामे मंदार गोपाळ दामले यांनी पासपोर्ट नुतनीकरणासाठी व विझासाठी परवानगी मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. आरोपी अर्जदार यांचे असे कथन आहे की, अर्जदारविरुद्ध भिगवण पोलिस स्टेशन अंतर्गत गुन्हा रजि.नं.२९४/२०२१, भा.दं.वि.कलम ३०४अ, २७९, ३३७, ३३८, ४२७ मोटार ॲक्ट १८४ प्रमाणे गुन्हा दाखल झालेला असून सदर गुन्हयाचा तपास पूर्ण होवून त्याचे चार्जशीट कोर्टात समरी फौ.ख.नं.३५१/२०२२ अन्वये दाखल आहे. अर्जदार हे शेतकरी कुटुंबातील असून त्यांचेविरुद्ध या गुन्हयाव्यतिरिक्त यापुर्वी कसल्याही प्रकारचा गुन्हा दाखल झालेला नाही अगर त्यांना कोणत्याही खटल्यामध्ये अगर गुन्हयामध्ये शिक्षा अगर दंड झालेला नाही. त्यामुळे ते परागंदा अगर फरारी होण्याचा प्रश्न निर्माण होत नाही.

३. आरोपी अर्जदार यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार यांच्याकडे गेल्या दहा वर्षापासून पासपोर्ट असून त्या पासपोर्टची मुदत दि.०२.०५.२०२३ रोजीपर्यंत आहे. अर्जदार यांना त्यांच्या कुटुंबासह वीणा वर्ल्ड टुर्स यांच्यातर्फे युरोप खंडामध्ये प्रवास करण्यासाठी दि.२६.०४.२०२३ ते ०५.०५.२०२३ या कालावधीत सेंझेन विझासाठी कोर्टाची परवानगीची आवश्यकता आहे. त्यासाठी अर्जदार यांनी त्यांच्याकडे असलेल्या पासपोर्ट नुतनीकरणासाठी संबंधीत अधिका—यांकडे अर्ज केलेला आहे. परंतु, आरोपीविरुद्ध प्रस्तुतचा खटला दाखल असल्याने पोलिसांनी पासपोर्ट नुतनीकरण करणेस कोर्टाची परवानगीची आवश्यकता असल्याचे सांगितले. म्हणून अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

४. सहा.सरकारी अभियोक्ता यांनी अर्जास हरकत घेतलेली असून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रस्तुत गुन्हयातील आरोपीचा पासपोर्ट नुतनीकरण झाल्यास आरोपी कोर्टात हजर राहणार नाही. त्यामुळे सदरील खटला चालविण्यास उशीर होणार आहे. गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

५. आरोपीने विझा दि.२६.०४.२०२३ ते ०५.०५.२०२३ या कालावधीकरीता मिळणेकामी अर्ज केलेला आहे. आरोपीने विझाचा कालावधी निश्चित स्पष्ट केलेला आहे. सदरच्या कालावधीमध्ये आरोपीस परदेशात जाण्याची परवानगी दिल्याने खटल्यास विलंब होण्याचा संभव वाटत नाही. तसेच पारपत्र नुतनीकरणासाठी सशस्त्र परवानगी दिल्याने खटल्याच्या कामकाजावर परिणाम होण्याचा संभव वाटत नाही. त्यामुळे अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे;

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार नामे मंदार गोपाळ दामले यांना आजपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी पासपोर्ट नुतनीकरणासाठी परवानगी देण्यात येत आहे.

३. अर्जदारास दि.२६.०४.२०२३ ते ०५.०५.२०२३ या कालावधीमध्ये युरोप खंडामध्ये प्रवास करण्यासाठी सेंझेन विझासाठी परवानगी देण्यात येत आहे.

४. अर्जदाराने खटल्यातील कामकाजासाठी आवश्यक असेल तेव्हा उपस्थित राहावे.

५. अर्जदाराने त्याच्या इतर परदेश दौ—याबाबत कोर्टास पुर्वकल्पना दयावी.

६. येणेप्रमाणे पारपत्र कार्यालयास सूचित करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SWANANDI DEVIDAS WADGAONKAR
Date: 2023.02.10 15:30:03 +0530

(स्वानंदी दे. वडगांवकर)

दिनांक : ०३/०२/२०२३ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. File judgment are same word for word as per original judgment."

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Madgundi S. A. |
| Court Name | : | Swanandi D. Wadgaonkar<br>Jt.CJJD. & JMFC, Indapur |
| Date | : | 03-02-2023 |
| Judgment signed by presiding officer on | : | 09-02-2023 |
| Judgment uploaded on | : | 09-02-2023 |